**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ०६/२०२६**

**मयुरी सोमनाथ व इतर वि. निरंक**

**<u>निशाणी ०१ खालील आदेश</u>**

**(पारीत दिनांक ३०/०४/२०२६)**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी संमतीने विवाह विच्छेदन होऊन मिळावे, असा त्यांनी हिंदू विवाह कायद्याचे कलम १३ब(१) नुसार दाखल केलेला अर्ज लग्नाच्या तारखेपासून १ वर्ष कालावधीच्या आतमध्ये कलम १४ अन्वये दाखल करण्याची परवानगी मिळावी, या मागणीसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे अर्जकथन की, अर्जदार क्र. १ व २ यांचा विवाह देवाची आळंदी, तालुका खेड, जिल्हा पुणे येथे दिनांक ०४/०८/२०२५ रोजी झालेला असून उभयतांमध्ये पती–पत्नी असे नातेसंबंध अस्तित्वात आहेत. उभयतांचा विवाह होणे आगोदर दोघेही अर्जदार हे घटस्फोटित होते. लग्नानंतर अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ कडे नांदण्यास माढा येथे आली. धार्मिक औपचारिकता पूर्ण झाल्यानंतर अर्जदार क्र. २ हा अर्जदार क्र. १ हिला तळ घरातील खोलीमध्ये सोडून आपल्या वेगळ्या खोलीमध्ये झोपण्यासाठी निघून गेला. सदर अर्जदार क्र. २ चे कृत्य हे अर्जदार क्र. १ हिला असामान्य वाटले. तरीही सदर कृतीकडे अर्जदार क्र. १ हिने दुर्लक्ष करुन दिनांक ०५/०८/२०२५ रोजी उभयजण देवदर्शनासाठी कोल्हापूर येथे गेले. प्रवासाच्या दरम्यान अर्जदार क्र. २ ने अर्जदार क्र. १ सोबत कोणताही संवाद केलेला नव्हता व नाही. हॉटेलमध्ये मुक्कामास असताना अर्जदार क्र. १ हिने अर्जदार क्र. २ चे सोबत शरीरसंबंध प्रस्थापित करण्याचा वारंवार प्रयत्न केला असता, त्याने कोणताही प्रतिसाद दिला नाही व उलट त्यास विरोध दर्शविल्यामुळे अर्जदार क्र. १ हिला प्रचंड धक्का बसला. अर्जदार क्र. १ हिने घडलेली हकीकत तिच्या आजी व आई–वडिलांना सांगितली. तदनंतर देखील अर्जदार क्र. १ हिने अर्जदार क्र. २

सोबत शारिरीक संबंध प्रस्थापित करुन सहवास करण्याचा प्रयत्न करुन देखील उभयतांमध्ये शारिरीक संबंध प्रस्थापित झालेले नाही. शारिरीक संबंध का प्रस्थापित करु शकत नाही, त्यासाठी वैद्यकीय उपचाराची आवश्यकता आहे काय, याबाबत अर्जदार क्र. २ कडे विचारणा करता, त्याने स्वतःची तपासणी करुन घेण्यास स्पष्ट नकार दिला. अर्जदार क्र. २ हा शारिरीक संबंध प्रस्थापित करण्यास समर्थ असल्याचे अर्जदार क्र. १ हिची खात्री झालेली असून त्या कारणावरुन उभयतांमध्ये तणाव निर्माण झाल्याने अर्जदार क्र. १ ही दिनांक २२/०८/२०२५ रोजी माहेरी परत आली व तेव्हापासून माहेरी राहत आहे.

३. अर्जदारांच्या नातेवाईकांनी व घरातील लोकांनी उभयतांनी एकत्रात यावे करिता भरपूर प्रयत्न केले, परंतु उभयतांची मने हे एकमेकांपासून दुभंगलेली असल्याने तसे शक्य झाले नाही व भविष्यात देखील एकत्र येण्याची सुतनाम शक्यता राहिलेली नाही. अर्जदारांच्या दरम्यान कोणतेही वैवाहिक संबंध प्रस्थापित होत नसून त्यांना संसारसुख उपभोगता येत नाही, त्यामुळे त्यांना मोठ्या संकटात ढकलण्यासारखे झालेले आहे. उभयतांना निष्कारण लग्न संबंधात अडकून राहावे लागत असल्याने अडचणीचे होऊ लागले आहे. यापूर्वी देखील अर्जदारांची अनेक वर्ष कोर्ट–कचेरीमध्ये गेलेले असून उभयतांची वय वाढत चालल्याने त्यांना प्रचंड अडचणी निर्माण झालेल्या आहेत, त्यामुळे अर्जदारांनी त्यांच्या घरातील मंडळी व नातेवाईक यांनी एकत्रात विचारविनीमय करुन एकमेकांपासून विभक्त होण्याचा निर्णय घेतलेला असून संमतीने विवाह विच्छेदन होउन मिळण्यासाठी उभयतांमध्ये एकमत झालेले असून त्यांनी तसा अर्ज सादर केलेला आहे. लग्न झाले तारखेपासून एक वर्षाच्या आतमध्ये संमतीने विवाह विच्छेदनासाठी अर्ज सादर करण्यास परवानगी नसून अर्जातील नमूद बाबी विचारात घेता, विशेष परिस्थिती अर्ज सादर करुन घेण्यास निर्माण झाली आहे. उभयतांमध्ये संमतीने विवाह विच्छेदन करुन घेण्याबाबत कोणताही आक्षेप राहिलेला नाही, त्यामुळे संमतीने विवाह

विच्छेदन होऊन मिळण्यासाठी अर्जदारांनी जो अर्ज सादर केला आहे, तो अर्ज दाखल करण्यात यावा व तशी त्यांना परवानगी असावी, अशी विनंती अर्जात केली आहे.

४. अर्जदारांतर्फे युक्तीवाद ऐकण्यात आला. अर्जात नमूद केल्याप्रमाणे मुद्दे अर्जदारांच्या विधिज्ञांनी उपस्थित करुन ***अभिषेक वाधवा वि. द्वारकेष आहुजा, MAT – APP.(F.C.) 443/2025, NAGPUR BENCH, date of decision 20/01/2026*** या निवाड्यातील निर्णयाचा दाखला अर्ज मागणीच्या समर्थनार्थ देण्यात आलेला आहे.

५. अर्जदारांच्यावतीने दाखलेखातर दाखल केलेला, ***अभिषेक वाधवा वि. द्वारकेष आहुजा*** या मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर वर नमूद निवाड्याचे बारकाईने वाचन करुन अर्जदारांचे अर्जातील कथनांचे बारकाईने वाचन करुन त्यात नमूद कारणे विचारात घेतली. पटलावरील दाखल कागदपत्रांचा सारासार विचार करता, अर्ज मागणीच्या समर्थनार्थ केवळ अर्जदारांनी आपला शपथपत्राद्वारा शपथेवर पुरावा नोंदविलेला असून उभयतांकडून कुटुंबातील कोणत्याही ज्येष्ट सदस्याची साक्ष अर्ज कथनाच्या समर्थनार्थ नोंदविण्यात आलेली नाही. तसेच, अर्ज मागणीच्या समर्थनार्थ वैद्यकीय उपचारासंदर्भातील कोणतेही कागदपत्र अर्जदारांनी अर्ज कथनाच्या समर्थनार्थ सादर केलेले नसून अर्ज कथनांवरुन लग्नानंतर अर्जदार हे काही काळ एकत्रात राहिलेले होते व आहे, असे दिसून येते.

६. वरील सर्व बाबींचा विचार करुन अर्जदार ज्या निवाड्याचा आधार अर्ज मागणीच्या समर्थनार्थ अर्जदार घेत आहेत, त्यातील घटना व परिस्थिती ही अर्जात नमूद घटना व परिस्थितीशी पडताळून पाहता, त्यात साम्यता दिसून येत नसल्यामुळे सदर निवाड्यातील निर्णय हा अर्जदाराच्या अर्ज मागणीस समर्थनीय ठरत नाही. वरील चर्चीलेल्या एकूण सर्व बाबींचा सारासार विचार करता व प्रकरणातील घटना व परिस्थितीचा सारासार

विचार करता, प्रस्तुत अर्जावर खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत होणे न्यायोचित होईल, अशा निष्कर्षापर्यंत हे न्यायालय येत असून त्याप्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदारांनी हिंदू विवाह कायद्याचे कलम १३ब(१) प्रमाणे दाखल केलेला अर्ज दाखल करण्यास परवानगी देण्यात आली.

३. तथापि, सदरहू अर्ज दाखल झालेनंतर तो दिनांक ०४/०८/२०२६ या तारखेपर्यंत न्यायालयाकडून पुढील आदेश पारीत करण्याकरिता सुप्त अवस्थेत ठेवण्यात येतो.

४. अर्जदारांनी आदेशाची नोंद घ्यावी.

५. वरीलप्रमाणे अर्ज निकाली काढला.

KARADE RATILAL MACHINDRA
Digitally signed by KARADE RATILAL MACHINDRA
Date: 2026.04.30 12:19:57 +0530

**(आर. एम. कराडे)**

दिनांक – ३०/०४/२०२६ दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, माढा.